# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या ९० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत

## शनिवार, दि.२३ एप्रिल, २०१६ सकाळी १०:३० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ९० वी (तातडीची) बैठक शनिवार, दि.२३ एप्रिल, २०१६ रोजी सकाळी १०:३० वाजता** मा. कुलगुरु यांच्या दालनात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. नंदनवार डी. आर., प्रभारी सहसंचालक, मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| ५) | श्री. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| ६) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

### स्वागत:

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

### अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. मा. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] १२ एप्रिल, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव: १२ एप्रिल, २०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.

[ ०२ ] **शै.वर्ष २०१६-१७ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र. एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०११ / (२४०/११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४, दि.०२/०९/२०१३ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म. वि. कायदा १९९४ कलम ८२(४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव.**

(टिपणी: शै. वर्ष २०१६-१७ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे नोंदणीकृत संस्थाकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र.एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२ / (२४७ / १२) मशि ४, दि.०२/०९/२०१३ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै. वर्ष २०१६-१७ पासून नोंदणीकृत संस्थेकडून व संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरुमहोदयांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.१८/०४/२०१६ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीसमोर आयत्या वेळचा विषय क्र.१ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आली असता, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने आयत्या वेळचा ठराव क्र.१ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आलेली आहे.

सबब शै. वर्ष २०१६-१७ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र.एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४, दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र.एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२ / (२४७ / १२) मशि ४, दि.०२/०९/२०१३ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म. वि. कायदा १९९४ कलम ८२(४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव सादर).

ठराव: **शै.वर्ष २०१६-१७ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र. एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०११ / (२४०/११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४, दि.०२/०९/२०१३ नुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली व महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०३ ] शै. वर्ष २०१६-१७ करिता संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: शै. वर्ष २०१६-१७ साठी संलग्नित महाविद्यालयाकडून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ए. आय. सी. टी. ई. अंतर्गत व पारंपारिक अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(४) अन्वये प्रथम महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारशी करिता सादर करुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारशीस्तव सादर करणे आवश्यक आहे व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीस्तव विहीत मुदतीत शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.१८/०४/२०१६ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ बैठकीत संलग्नित महाविद्यालयांकडून शै. वर्ष २०१६-१७ करिता नैसर्गिक विस्तारासाठी प्राप्त प्रस्तावांना शिफारस करण्याची बाब सादर केली असता, ठराव क्र.४ अन्वये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने सोबतच्या तक्ता "ब" मधील महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब, शै. वर्ष २०१६-१७ करिता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **शै. वर्ष २०१६-१७ करिता संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०४ ] **शै. वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखडा विचारार्थ.**

(टिपणी: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने दि.१८/०४/२०१६ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.०५ अन्वये, शै. वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखड्यास व प्राप्त निवेदनास अनुसरुन शै. वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा खालील प्रमाणे तयार करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस क रण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.०५ | १. प्रस्तुत विद्यापीठाकडे प्राप्त निवेदने विचारात घेता,<br>• Training Officer, Composite Training Battalion, Ahamadnagar यांनी सादर केलेल्या निवेदनामध्ये नमुद केलेले अभ्यासक्रम हे पदविका (Diploma) स्थरावरील असल्याने सदरचे अभ्यासक्रम शै.वर्ष २०१७-१८ च्या बृहत आराखडयात घेण्यात आलेले नाहीत.<br>• अक्षर मल्टिपर्पज सोशल ट्रस्ट, सोलापूर यांचे निवेदन अवलोकनी घेता, सदर संस्थेला कंदलगाव, ता.द.सोलापूर येथे विज्ञान महाविद्यालय सुरु करावयाचे आहे परंतु मंद्रुप, ता.द.सोलापूर येथे सद्यस्थितीत विज्ञान विद्याशाखा सुरु असून कंदलगाव व मंद्रुप या दोन्ही ठिकाणाचे अंतर हे २० कि.मी. पेक्षा कमी असल्यामुळे शै.वर्ष २०१७-१८ च्या बृहत आराखडयात कंदलगाव या ठिकाणाचा समावेश करण्यात आलेला नाही.<br>२. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे परिपूर्ण पणे गठन झाल्यानंतर सदर मंडळाच्या निर्णयाच्या अधिन राहून मु.पो.जामगाव, ता.बार्शी येथे रेल्वे इंजिनिअरींग महाविद्यालयाची शै.वर्ष २०१७-१८ च्या बृहत आराखडयामध्ये समावेश करण्यात येत आहे.<br>शै.वर्ष २०१७-१८ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालय, नवीन अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव प्राप्त करण्यास्तव खालील प्रमाणे बृहत आराखडा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे. |

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

शै.वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय / अभ्यासक्रम / विद्याशाखा सुरु करु इच्छिणाऱ्या संस्थांसाठी

शैक्षणिक

बृहत आराखडा

सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रात ज्या नोंदणीकृत सस्थांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर खालील प्रमाणे (प्रस्तावित ठिकाण व त्या समोरील अभ्यासक्रमासाठी) नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहेत (बी.बी.ए, बी.सी.ए, बी.एस्सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (बी.एस.डब्लु व एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम.बी.ए, बायोटेक्नॉलॉजी व एम.सी.ए ही महाविद्यालये वगळता) अशा सर्व नोंदणीकृत संस्थांना कळविण्यात येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे (विद्यापीठाच्या बृहत आराखडयानुसारच) विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. **सदर बृहत**

**आराखडा हा संलग्नित महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रम व नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठीही लागू राहील.**

नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (३) नुसार दि.३१ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत विद्यापीठाकडे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळता स्विकारण्यात येतील. विहीत नमुन्यातील अर्ज वित्त व लेखा विभाग (प्रकाशन विभागात) रु.१,०००/- शुल्कास कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | बृहत आराखडयातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | **सोलापूर शहर** | |
| | सोलापूर शहर | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सायन्स |
| | | बॅचलर ऑफ जरनॅलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन |
| | | विधी महाविद्यालय |
| | | चित्रकला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| २. | **उत्तर सोलापूर** | |
| | वडाळा | वाणिज्य महाविद्यालय |
| ३. | **दक्षिण सोलापूर** | |
| | वळसंग | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | बोरामणी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | होटगी / फताटेवाडी / आहेरवाडी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ४. | **अक्कलकोट** | |
| | अक्कलकोट | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला विद्याशाखे अंतर्गत पदव्युतर अभ्यासक्रम |
| | दुधनी / चपळगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मैंदर्गी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| ५. | **बार्शी** | |
| | बार्शी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | वैराग | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला व सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | जामगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | रेल्वे इंजिनिअरींग महाविद्यालय |
| | मालवंडी | कला महाविद्यालय |
| ६. | **मोहोळ** | |
| | मोहोळ | विज्ञान महाविद्यालय |
| | नरखेड | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | कुरुल | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |

| | | |
|---|---|---|
| ७. | **मंगळवेढा** | |
| | मंगळवेढा / नंदेश्वर | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | बोराळे / डोणज | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | सलगर (बु.) | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ८. | **सांगोला** | |
| | सांगोला / जुनोनी | बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ॲन्ड डिझाईन |
| | महुद / वाकी शेवणे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ९. | **माढा** | |
| | माढा / कुर्डुवाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | टेंभुर्णी | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १०. | **माळशिरस** | |
| | माळशिरस | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | नातेपुते | वाणिज्य महाविद्यालय |
| | | जर्नलिझम महाविद्यालय |
| | जाधववाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | पानीव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | तांबवे | कला महाविद्यालय |
| ११. | **करमाळा** | |
| | करमाळा | विज्ञान महाविद्यालय |
| | जेऊर / झरे | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | भिलारवाडी / जिंती | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १२. | **पंढरपूर** | |
| | पंढरपूर | संत वाङमय महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान रात्र महाविद्यालय |
| | कोर्टी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| टिप- १. | शै. वर्ष २०१६-१७ साठी मान्यता प्राप्त संस्था / संलग्नित महाविद्यालयांकडून बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस्सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम.बी.ए., बायोटेक्नॉलॉजी व एम.सी.ए या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. | |
| २. | नॅक मुल्यांकन /पुनर्मुल्यांकन झालेल्या 'अ' मानांकन प्राप्त महाविद्यालयाना प्राधान्य असेल. | |
| ३. | नामवंत औद्योगिक संस्थांना सामाजिक बांधीलकी म्हणून नवीन उच्च दर्जाची महाविद्यालये / अभ्यासक्रम सुरु करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. | |
| ४. | बृहत आराखडा संदर्भात शासनाकडून वेळोवेळी विहीत केली जाणारी मार्गदर्शक तत्वे / सूचना / आदेश लागू राहतील. | |

सबब, शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षासाठी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने उपरोक्त प्रमाणे तयार केलेला शैक्षणिक बृहत आराखडा विद्या परिषदेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: शै. वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखड्यास विद्या परिषदेस सर्वानुमते मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ ०५ ] श्री. विजयकुमार लक्ष्मण निर्मळे यांचेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवर तक्रार निवारण समितीच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: श्री. विजयकुमार लक्ष्मण निर्मळे यांनी भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव या महाविद्यालयात कार्यरत असताना महाविद्यालयाकडून वेगवेगळे देयक देण्यात आलेली नसल्यामूळे दि.२३/१२/२०१४ रोजीच्या अर्जान्वये प्रस्तूत कार्यालयाकडे विहीत नमुन्यात विहीत शुल्क भरुन तक्रार निवारण समितीकडे अर्ज (ॲडव्हान्स कॉपी) सादर केलेला होता. याबाबत प्राचार्य, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव यांनीही त्यांच्याकडे प्राप्त झालेले श्री. विजय लक्ष्मण निर्मळे अर्जाच्या सात प्रती अभिप्रायासह या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. सदरच्या अभिप्रायामध्ये प्राचार्यांनी श्री. निर्मळे हे सद्यस्थितीत महाविद्यालयात कार्यरत नसल्याचे नमूद केलेले अहे.

उपरोक्तप्रमाणे श्री. निर्मळे यांचा तक्रार अर्ज दि.१६/०१/२०१५ रोजीचा तक्रार निवारण उपसमिती (छाननी समिती) समोर सादर केला असता, छाननी समितीने श्री. विजयकुमार लक्ष्मण निर्मळे यांचा तक्रार अर्ज हे तक्रार निवारण समितीसमोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

वरीलप्रमाणे तक्रार निवारण समितीने केलेली शिफारशीस अनुसरुन श्री. निर्मळे यांचा अर्ज तक्रार निवारण समितीसमोर सादर करावे लागणार आहे व तक्रार निवारण समितीने दिलेला निर्णय मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करुन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर निर्णय संबंधितास कळवावे लागणार आहे.

तथापि, प्रस्तूत विद्यापीठाचे सर्व अधिकार मंडळ हे ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी बरखास्त झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाचे आवर सचिव, प्रकाश रा. कदम यांचे दि.२५/०८/२०१५ रोजीचे पत्र क्र.मविस-२०१५ / (११२ / १५) / विशि-४ अन्वये प्राप्त झालेला पत्र अवलोकनी घेता, सदर पत्रामध्ये महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या अनुसूचिमध्ये उल्लेख केलेल्या विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणूका ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यत भरण्यात येवू नयेत असे नमूद केलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे छाननी समितीने केलेली शिफारस तक्रार निवारण समितीसमोर सादर करणे आवश्यव आहे. तथापि, तक्रार निवारण उपसमितीने श्री. निर्मळे यांचा अर्ज तक्रार निवारण समितीसमोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे. तथापि, सद्यस्थितीत तक्रार निवारण समितीवर सदस्य सचिव वगळता इतर कोणतेही सदस्य अस्तित्वात नसल्यामूळे मा. कुलगुरुमहोदयांनी संबंधित कर्मचारी हा महाविद्यालयात कार्यरत नसल्याने संबंधिताची तक्रार ही महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७ अंतर्गत गठीत तक्रार निवारण समितीच्या अधिकार कक्षेत येत नसल्याचे संबंधितास कळविणेबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये तक्रार निवारण समितीच्या वतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, श्री. विजयकुमार लक्ष्मण निर्मळे यांचेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवर तक्रार निवारण समितीच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **श्री. विजयकुमार लक्ष्मण निर्मळे यांचेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवर तक्रार निवारण समितीच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: महाराष्ट्र समान लेखा संहितेमधील Appendix-II नुसार, दि.०८ जून, २०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने सेंट्रल बँक ऑफ इंडिया व इतर सर्व बँकेकडील सर्व खात्यांच्या धनादेशावर खालीलप्रमाणे स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

१. रक्कम रु.५०,०००/- पर्यंतच्या धनादेशावर लेखापाल व उपकुलसचिव किंवा वित्त व लेखा अधिकारी यांना स्वाक्षरीचे अधिकार संयुक्तपणे देण्यात आले आहेत.

२. रक्कम रु.५०,०००/- च्या पुढील धनादेशावर वित्त व लेखा अधिकारी यांच्या सोबत उपकुलसचिव किंवा लेखापाल यांना स्वाक्षरीचे अधिकार संयुक्तपणे देण्यात आले आहेत.

दि.३०/०३/२०१५ रोजी या विभागाकडील उपकुलसचिव श्री. एस. बी. अनपट हे आपल्या मूळ सेवेत म्हणजेच शासन सेवेत रुजू झाले आहेत.

त्यानुसार या विभागाकडे मार्च अखेरची काम सुरु असल्याने उपकुलसचिव यांचे चेकवर सही करण्याचे अधिकार या विभागाकडे नव्याने रुजू झालेले सहा. कुलसचिव श्री. कांबळे डी. एस. यांना देण्यासाठी समान लेखा संहिता तरतूद क्र.Appendix-I, DP-Note 1 नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.३१/०३/२०१६ पासून सहा. कुलसचिव श्री. कांबळे डी. एस. यांना उपकुलसचिव यांचे समान लेखा संहितेनुसार स्वाक्षरीचे अधिकार देण्याकरिता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतूद १४(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु यांनी मान्यता दिली आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: **मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४(७) अन्वये केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०७ ] सोलापूर विद्यापीठ परिसरातील नियमित शिक्षक पदासाठी उमेदवारांकडून मागविण्यात येणाऱ्या आवेदन पत्रासमवेतच्या शुल्कात वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध संकुलात ०६ नियमित शिक्षकीय पदे रिक्त असून, त्याचे विवरण खालील प्रमाणे :

| Sr. No. | Name of the School | Name of the Post | Category and No. of Posts | Subject / Specialization |
|---|---|---|---|---|
| 1 | School of Earth Sciences | Professor | Unreserved - 01 | Geology |
| | | Associate Professor | Unreserved - 01 | Geology |
| 2 | School of Computational | Professor | Unreserved - 01 | Mathematics / Statistics |
| | | Associate Professor | SC - 01 | Mathematics |
| 3 | School of Physical Sciences | Associate Professor | SC - 01 | Physics |
| | | Assistant Professor | ST - 01 | Physics |

उपरोक्त पदांची जाहिरात तयार करण्यात आली असून, सदर जाहिरात लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर, महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर तसेच A. I. U. नवी दिल्ली येथे व दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून ते आजतागायत नियमित शिक्षकांच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीत उमेदवारांच्या अर्जासमवेत खुल्या प्रवर्गासाठी शुल्क रु.१५०/- व राखीव प्रवर्गासाठी शुल्क रु.७५/- चा धनाकर्ष मागविण्यात येत आहे.

सद्यस्थितीत प्रस्तूत विद्यापीठातील नियमित शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार माहे वेतन आदा करण्यात येते. सदर नमूद केलेले शुल्क अत्यंत जुने व सध्या जाहिरात प्रसिध्द करण्याचे दरही वाढलेले आहेत. तसेच याबाबत इतर विद्यापीठात दूरध्वनीद्वारे संपर्क साधून विचारणा केली असता, त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विद्यापीठाचे नाव | खुला प्रवर्गासाठी आवेदन पत्राबरोबरचे शुल्क | राखीव प्रवर्गासाठी आवेदन पत्राबरोबरचे शुल्क |
|---|---|---|---|
| १) | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | रु.५००/- | रु.३००/- |
| २) | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | रु.६००/- | रु.३००/- |
| ३) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | रु.१,०००/- | रु.५००/- |
| ४) | सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | रु.६००/- | रु.३००/- |

उक्त वस्तुस्थिती व इतर विद्यापीठांचे शिक्षक पदांच्या आवेदन पत्राबरोबरचे शुल्क विचारात घेता प्रस्तूत विद्यापीठाची जाहिरात प्रसिध्द करताना येथून पुढे खुल्या प्रवर्गासाठी शुल्क रु.१,०००/- व राखीव प्रवर्गासाठी शुल्क रु.५००/- असे ठेवण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **सोलापूर विद्यापीठ परिसरातील नियमित शिक्षक पदासाठी उमेदवारांकडून मागविण्यात येणाऱ्या आवेदन पत्राबरोबरच्या शुल्कात येथून पुढे खुल्या प्रवर्गासाठी शुल्क रु.१,०००/- व राखीव प्रवर्गासाठी शुल्क रु.५००/- इतकी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] वाणिज्य विद्याशाखातंर्गत M. B. A. या कोर्ससाठी नव्याने केलेल्या अध्यादेशास (Ordinances) विद्या परिषदेने स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.१२/०४/२०१६ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय ठेवला असता ठराव क्र.८८(७) नुसार विद्या परिषदेने सदरचा विषय स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे.

पूर्वीच्या M. B. A. या कोर्सचा अध्यादेशामध्ये विषयावर Passing Presentage ४०% होती व एकत्रित aggreagte ५०% होती. परंतु शासनाच्या आदेशानुसार जून, २०१५ पासून सर्व पी. जी. च्या प्रथम वर्षाला निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागू करण्यात आली असल्यामूळे दोन वेगवेगळे Passing Criteria ठेवू शकत नाही. कारण ग्रेडिंग सिस्टीम असल्यामूळे त्यासाठी मूळ Passing Presentage हे ४०- वर ठेवण्यात येत असल्यामूळे ५०- नियम हा ग्राह्य धरण्यात येणार नाही. अशा प्रकारे M. B. A. या कोर्सचा नव्याने अध्यादेश (Ordinacnce) तयार करण्यात आला आहे.

सबब, वाणिज्य विद्याशाखातंर्गत M. B. A. या कोर्ससाठी नव्याने केलेल्या अध्यादेशास (Ordinance) विद्या परिषदेने स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ).

ठराव: **वाणिज्य विद्याशाखातंर्गत M. B. A. या कोर्ससाठी नव्याने केलेल्या अध्यादेशास (Ordinances) विद्या परिषदेने केलेली शिफारस स्वीकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] BCA हा अभ्यासक्रम वाणिज्य विद्याशाखेऐवजी विज्ञान विद्याशाखेतंर्गत समाविष्ट करण्याची तसेच MCA हा अभ्यासक्रम वाणिज्य व अभियांत्रिकी विद्याशाखेतून वगळण्याची बाब विद्या परिषदेने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.१२/०४/२०१६ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय ठेवला असता ठराव क्र.५५(१५) नुसार विद्या परिषदेने सदरचा विषय स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली आहे.

BCA हा अभ्यासक्रम सद्यस्थितीत वाणिज्य विद्याशाखेतंर्गत समाविष्ट आहे. परंतु विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.११ जुलै, २०१४ च्या अधिसूचनेमध्ये BCA हा अभ्यासक्रम विज्ञान विद्याशाखेतंर्गत समाविष्ट करण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे BCA हा अभ्यासक्रम प्रस्तूत विद्यापीठात वाणिज्य विद्याशाखेतंर्गत समाविष्ट असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेन्वये BCA हा अभ्यासक्रम वाणिज्य विद्याशाखेऐवजी विज्ञान विद्याशाखेत समाविष्ट केलेला आहे. तसेच MCA हा अभ्यासक्रम प्रस्तूत विद्यापीठात विज्ञान, वाणिज्य व अभियांत्रिकी विद्याशाखेमध्ये अंर्तभूत केला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.११ जुलै, २०१४ च्या अधिसूचनेन्वये MCA हा अभ्यासक्रम फक्त विज्ञान विद्याशाखेमध्ये समाविष्ट केलेला आहे. परंतु सद्यस्थितीत प्रस्तूत विद्यापीठातंर्गत वाणिज्य व अभियांत्रिकी विद्याशाखेतंर्गत महाविद्यालयामध्ये सुरु असणारा MCA हा अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे. सोबत संलग्नता विभागाकडून वाणिज्य व अभियांत्रिकी विद्याशाखेतंर्गत MCA हा अभ्यासक्रम बंद झालेल्या महाविद्यालयांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.

सबब, BCA हा अभ्यासक्रम वाणिज्य विद्याशाखेऐवजी विज्ञान विद्याशाखेतंर्गत समाविष्ट करण्याची तसेच MCA हा अभ्यासक्रम वाणिज्य व अभियांत्रिकी विद्याशाखेतून वगळण्याची बाब विद्या परिषदेने स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ).

ठराव: **BCA हा अभ्यासक्रम वाणिज्य विद्याशाखेऐवजी विज्ञान विद्याशाखेतंर्गत समाविष्ट करण्याची तसेच MCA हा अभ्यासक्रम वाणिज्य व अभियांत्रिकी विद्याशाखेतून वगळण्याबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ १० ] **प्रस्तूत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात व विद्यापीठ संकुलामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रापैकी स्थलांतर दाखला (Transfer Certificate) किंवा स्थानांतर दाखला (Migratioin Certificate) गहाळ झाल्यास अथवा खराब झाल्यास किंवा सदर दाखल्यांची दुबार प्रती देखील गहाळ झाल्या तर अशा परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यासाठी तयार केलेल्या नियमावलीची बाब विचारार्थ.**

(टिपणी: शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर येथे बी. ए. भाग- १ या अभ्यासक्रमासाठी कु. आसीया बानु शम्सोदिन पटेल ही विद्यार्थीनी प्रवेशीत होती. सदर विद्यार्थीनी ही डी. एड. ची परीक्षा उत्तीर्ण असल्यामूळे या विद्यार्थीनीची पात्रता कायम होण्यासाठी स्थानांतर दाखला (Migration Certificate) ची आवश्यता होती.

परंतु सदर विद्यार्थ्यांकडून स्थानांतर दाखला (Migration Certificate) ची मूळ प्रत व दुबार प्रत (Duplicate copy) या दोन्ही गहाळ झाल्या आहेत. या विद्यार्थीनीच्या पात्रता अर्जासोबत (Migration Certificate) च्या दुबार प्रतीची (Duplicate copy) छायांकित प्रत जोडलेली आहे. या छायांकित प्रती वर सदर विद्यार्थीनीची पात्रता कायम करता येत नसल्याने तसेच याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अध्यादेशामध्ये कोणतीही तरतूद नसल्याने सदर विद्यार्थीनीची पात्रता कायम करण्यासंदर्भात दि.१०/०२/२०१६ रोजी मा. कुलगुरुंच्या आदेशासाठी टिपणी सादर केली असता अशा बाबतीत मा. कुलसचिवांनी पृष्ठांकन केल्यानुसार नियमावली तयार करुन व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यास मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे.

सदर मान्यतेस अनुसरुन केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर).

ठराव: **प्रस्तूत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात व विद्यापीठ संकुलामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रापैकी स्थलांतर दाखला (Transfer Certificate) किंवा स्थानांतर दाखला (Migratioin Certificate) गहाळ झाल्यास अथवा खराब झाल्यास किंवा सदर दाखल्यांची दुबार प्रती देखील गहाळ झाल्या तर अशा परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यासाठी तयार केलेल्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| सचिव | अध्यक्ष |
| व्यवस्थापन परिषद | व्यवस्थापन परिषद |